**दि.मु.नं.८९/२०१४**

## आदेश नि.२० खाली

सदरहु अर्ज सत्यम गृहनिर्माण सहकारी संस्था करिता सचिव सदानंद भोसले यांनी त्यांच्या गृहनिर्माण संस्थेला या दाव्यात पक्षकार म्हणून सामील करून घेण्यात यावे व त्यांची बाजू मांडण्यास संधी मिळावी अशा मागणीकरिता केला आहे. त्यांचे म्हणण्यानुसार दावा मिळकती येथील जमीन ही मानीव अभिहस्तांतरण पत्र मार्गाने त्यांच्या सोसायटीच्या नांवे झालेली आहे व तशी ७/१२ कब्जेदार सदरी नोंद झालेली आहे. अशाप्रकारे वादीच्या ताब्यातील गाळा हा अनधिकृत असल्याने व तो सोसायटीचा सभासद असल्याने तो गाळा तोडून टाकणे योग्य ठरणार आहे. त्या संदर्भात ग्रामपंचायत, तहसिलदार, जिल्हाधिकारी स्तरावर सोसायटीने तक्रारी केलेल्या आहेत असे देखील अर्जदार म्हणतो. या प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.१ ग्रामपंचायत यांनी थातूरमातूर कैफियत देवून स्पष्ट परिस्थिती मांडलेली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात सोसायटीचे म्हणणे न ऐकता दाव्यात पुढे गेल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान व गैरसोय होईल असे सोसायटीचे म्हणणे आहे. सच्बब दाव्यात सामील करून घेण्यात यावे अशी विनंती त्यांनी केली आहे.

२. वादीने अर्जाला हरकत घेवून अर्जदार सोसायटीचा दाव्याशी काहीही संबंध नाही असे म्हणणे मांडले आहे. अर्जदार सोसायटीने त्यांचे म्हणणे मांडण्या करिता स्वतंत्र दावा करावा असे देखील वादी म्हणतो. अर्जातील सर्व मजकूर खोटा व खोडसाळ आहे असे देखील वादीचे म्हणणे आहे.

३. अर्जदार गृहनिर्माण सहकारी संस्थेने सचिव श्री.सदानंद लक्ष्मण भोसले यांचे अर्जापुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अशाप्रकारे अर्जदार संस्थेचे म्हणणे वाचल्यानंतर त्याना दाव्यात सामील करून घेणे दावा विषयकच्या योग्य निर्णया करिता आवश्यक वाटते. दावा प्रकरणामध्ये तुर्तातूर्त मनाई हुकूमासाठी अर्ज चौकशी प्रलंबीत आहे. ग्रामपंचायतीने इमारत पाडून टाकण्याची नोटीस दिल्यामुळे

वादीला तुर्तातूर्त मनाई हुकूमाच्या आदेशासाठीचा अर्ज निर्णय होईपर्यन्त कारवाई करू नये असा देखील आदेश देण्यात आलेला आहे. हा आदेश होताना अर्जदार संस्था न्यायालयासमोर नव्हती. परंतु त्यांचा दाव्यात सामील करून घेण्याचा अर्ज दाखल झालेला नव्हता. अशा परिस्थितीमध्ये वादीला या आधीच तात्काळ इमारत तोडण्याच्या भितीपासून संरंक्षण मिळाल्याने अर्जदाराचे म्हणणे या स्तरावर ऐकणे क्रमप्राप्त ठरते व त्यानंतरच तुर्तातूर्त अर्जाचा विचार करणे योग्य होईल. अर्जदार संस्थेने शपथपत्राआधारे दावा इमारतीखालील जमीन ७/१२ सदरी त्यांचे नावावर आहे असे ठामपणे म्हटले आहे. ही बाजू लक्षात घेता अर्ज मंजूर करण्यात येतो. अर्जदाराला प्रतिवादीपणात सामील करून घेण्यात यावे. वादीनी आदेशाची नोंद घ्यावी व अर्जदार गृहनिर्माण संस्थेला दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामील करून तशी दुरूस्ती करून घ्यावी.

दिनांक :— २३/०७/२०१५.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खेड.